प्रकरण पाचवे

# अण्णाभाऊंची विचारप्रणाली व कादंबरीतील स्त्रीचित्रणांचे विशेष

# प्रकरण पाचवे

# अण्णाभाऊंची विचारप्रणाली व कादंबरीतील स्त्री चित्रणांचे विशेष

## ०१. प्रस्तावना :

मराठी साहित्याला वास्तवानुभूतीचा भक्कम पाया देणारे साहित्यिक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० मध्ये झाला. दलित समाजात मांग जातीत जन्मलेल्या अण्णाभाऊंची संपूर्ण जीवन कहाणीच अत्यंत दरिद्री अवस्थेच्या अंधारात घडली. घराण्याची परंपरा नसलेल्या, सोयीसुविधांच्या सततच्या दुष्काळात वाढले, ना शिक्षणाची संधी. सर्वत्र अंधार आणि अभाव अशा परिस्थितीतून आलेल्या अण्णाभाऊंचे लेखन म्हणूनच पूर्वकालीन समीपकालीन यांपेक्षा श्रेष्ठ ठरते.

अण्णाभाऊंनी शाहिरी, कथा, कादंबरी, नाटक इ. वाङ्मयप्रकारातून आपल्या जीवनानुभवाचे वास्तव साहित्यात आणले आणि दलित साहित्य संख्यात्मक गुणात्मक दृष्टीने संपन्न केले. असे सर्वच वाङ्मयप्रकारांना समृद्ध करणारे अण्णा भाऊ साठे यांच्याकडे त्यांची स्वत:ची अशी मार्क्सवादाच्या मुशीतून घडलेली तत्त्वप्रणाली होती. ते स्वत:चा असा वेगळा समतेचा, सामाजिक परिवर्तनाचा व्यापक, सर्वांगीण विचार घेऊनच साहित्यलेखन करत. त्यांनी आपल्या कथा, कादंबऱ्यांना जोडलेल्या, अर्पणपत्रिका, कैफियत, चार शब्द , या सर्वांमधून या त्यांच्या मतप्रणालीचा प्रामाणिकपणे स्विकार करतात व त्या स्वीकारलेल्या लेखनभूमिकेशी शेवटपर्यंत बांधील राहतात. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्या, त्यातील स्त्री-चित्रणे विशिष्ट विचाराला धरूनच आकार घेताना दिसतात असे मला वाटते.

प्रस्तुत प्रकरणात अण्णाभाऊंची विचारसरणी त्यांच्या निवडक कादंबऱ्यांमधून विचाराला धरुन निर्माण झालेली स्त्री चित्रणे, त्या स्त्रीचित्रणांचे विशेष, कादंबरीतील आशयस्वरुपाला अनुलक्षून बाळगलेली तत्त्वप्रणाली आणि तिच्याशी पूर्णपणे इमान राखूनच केलेले कादंबरीलेखन त्यातून साकारणाऱ्या मनस्वी नायिका आणि या सर्वांबरोबर त्यांच्या लेखनात दिसून येणारे साम्यवादी विचारांचे प्रतिबिंब या दिशेने अभ्यास करण्याचे ठरविले आहे.

## ०२. अण्णा भाऊ साठे यांची विचारप्रणाली :

अव्वल दर्जाची प्रतिभा लाभलेल्या अण्णाभाऊंना लहानपणापासूनच पोवाडे, तमाशे, गाणी, लोकगीते पाठ करुन गाऊन दाखविण्याचा छंद होता. त्यातूनच त्यांच्यातील लेखकाला प्रेरणा मिळाली आणि १९४२ पासून त्यांच्या स्फूट लेखनाला सुरुवात झाली. लहानपणापासून प्रतिकूल परिस्थितीत वाढलेल्या अण्णाभाऊंना जीवनात येणाऱ्या कोणत्याही संघर्षात ताठपणे उभे राहण्याची

सवय याच अभावपूर्ण जीवनाने लावली. समाजाकडे डोळसपणे पाहण्याचा दृष्टिकोण त्यांच्याकडे आला व १५-१६ वर्षाचे असतानाच समाजातील चांगल्या-वाईट घटनांची सहजपणे जाणीव होऊ लागली. संवेदनशील मन आणि डोळस वृत्ती या उपजत गुणांना कम्युनिस्ट पक्षात सामील झाल्यानंतर तिथली शिस्त, तिथून मिळणारा साम्यवादाने भारलेला मानवतावादी विचार यांची जोड मिळाली व त्यांचे वैयक्तिक व साहित्यिक जीवन संस्कारित झाले. म्हणूनच, 'चित्रा' कादंबरीच्या प्रस्तावनेत ते याची कबुली देताना म्हणतात, "कम्युनिस्ट पार्टीही अण्णा भाऊंनी लेखक व्हावे या दृष्टिने आवश्यक ते सहकार्य करीत होती."[१]

माणसांवर प्रेम करणाऱ्या या लेखकाचा गुरुही तसाच मानवप्रेमी व मानवतावादाचा भाष्यकार होता. त्याविषयी लिहिताना साठे म्हणतात, "प्रारंभीच्या काळात जागतिक कीर्तीचा मानवतावादी लेखक मॅक्झिम गॉर्कीच्या लेखनाचा भाषांतरीत रुपात परिचय झाला आणि तो त्यांच्या गुरु बनला."[२]

कम्युनिस्ट पक्षाचे मार्गदर्शन आणि गॉर्कीच्या लेखनाचा प्रभाव यांनी संस्कारित झालेल्या अण्णाभाऊंच्या एकूण साहित्य लेखनाची जडणघडणही शाळा-विद्यापीठांच्या चार भिंतीत न होता जगाने दिलेल्या अनुभवातूनच झाली होती. या दाहक अनुभवांचे कण साहित्यात अण्णा भाऊंनी ओतले आणि साहित्याला कल्पितापेक्षा जीवनाच्या वास्तवतेचा सुगंध प्राप्त करुन दिला. ही वास्तवता साहित्यात आणत असताना प्रेम, वासना, द्वेष, मत्सर, या संवेदना त्यांच्यातील भावनाप्रधानतेमुळे अवतरल्या. फुले-आंबेडकर-शाहू यांचा वारसा चालविणाऱ्या अण्णा भाऊंनी त्यांनीच दिलेला सामाजिक परिवर्तनाशी नाते सांगणारा समाजाला गती देणारा व साहित्याला या सर्वांचे शस्त्र मानणारा एक जीवनवादी आशावाद लेखणीतून मांडण्यास प्रथमच सुरुवात केली. म्हणूनच यशवंत मनोहर त्यांच्या लेखननिर्मितीविषयी लिहितात, "अण्णा भाऊंनी फुल्यांचे डोळे घेतले आणि त्यांना जीवनातील कुरूपता दिसली. मार्क्सची माणुसकी घेतली आणि इथला नरक त्यांना दिसला...."[३]

सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक या दृष्टिंनी भरडल्या गेलेल्या माणसाला आपला लेखनविषय बनविले. पोटाच्या भुकेसाठी अन्न, लज्जा रक्षणासाठी वीतभर कपडा आणि आधारासाठी निवारा या प्राथमिक गरजाच पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस धडपडणारा, माणूस अण्णाभाऊंनी रेखाटला. ही माणसाची धडपड पाहत असताना समाजात शोषक-शोषित अशी वर्गवारी झालेला समाज त्यांनी पाहिला आणि अनुभवलाही. त्याच शोषितांचे, अन्यायाविरुद्ध संघर्ष देणाऱ्या व्यक्तिरेखांचे जीवन प्रामाणिकपणे निष्ठेने चित्रित करणे व जे दडवले, दडपले गेले

त्याला लोकांसमोर आणण्याची इच्छा हाच त्यांच्या साहित्यलेखनापाठीमागचा महत्त्वाचा विचार होता.

अण्णाभाऊंनी आपल्या बुद्धिला पटेल ते सत्य मानून, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर आधारलेला वाङ्मय दृष्टिकोनाचा पाया निश्चित केला. जगण्यासाठी धडपडणाऱ्या माणसांची कर्मकहाणी अण्णाभाऊंच्या सर्वच साहित्यातून आविष्कृत झाली आहे.[४]

हे पाटील यांचे मत खरेच आहे. दलित माणसाला कामगाराला त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपली लेखणी झिजविलेली आहे.

साहित्य आणि मानवी जीवन यांचा अन्योन्य संबंध आहे. म्हणूनच हे मानवी जीवन ज्या गुलामगिरीच्या जोखडांमध्ये, जातिव्यवस्थेच्या बंधनांमध्ये अडकलेले आहे. ज्या भांडवलशाहीमध्ये लुबाडले जाते आहे अशा मानवी जीवनामध्ये समतेचे स्वातंत्र्याचे मूळ रूजविण्यासाठी अण्णाभाऊंनी साहित्य लिहिले. 'समाजातील वास्तवाचे चित्रण करणे' हाच त्यांच्या साहित्याचा नेहमी उद्‌देश राहिला. म्हणूनच त्यांचे साहित्य मनाला जाऊन भिडते. येथे अण्णाभाऊंचा स्वतःच्याच साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात येतो. ''खरी कला ही सदैव काळजाशी भिडून बोलते.'' अशा साहित्याला कृत्रिमतेचीही गरज असत नाही. हेच त्यांच्या साहित्य व्यवहाराचे खरे आधारसूत्र होते. वर्गीय, जातीय हितसंबंधांच्या पूर्णपणे विरोधी असलेले अण्णाभाऊ यांची वैचारिक सघनतेवर अपार निष्ठ होती. तोच त्यांचा वाङ्मयीन विचारदृष्टिकोन असल्यामुळेच अन्याय, शोषण, पिळवणूक यांना त्यांनी साहित्यातून विरोध केला. क्रांतीचे धडे देतच जीवनातल्या आशावादावरच वास्तव उभे करण्याचा प्रयत्न जो त्यांनी केला तोच अण्णाभाऊंच्या समाज विचारप्रणालीचे सूत्र असल्याचे डॉ. गुरव म्हणतात.[५]

'माणूस' हाच साहित्याचे केंद्र असणाऱ्या अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यात जे वास्तव आले त्याच वास्तवाने निराकाराला आकार मिळवून दिला व शब्दप्रभूंना कलात्मकतेच्या कोंदणात बसविण्याचा प्रयत्न केला. समाजाला दिशा देण्याचे सामर्थ्य असलेल्या साहित्यातून सामाजिक बांधिलकी व्यक्त केली. साक्षात जीवनच रेखाटणाऱ्या अण्णाभाऊंनी नेहमीच जीवनाचे पाईक होणे मान्य केले व त्याच जीवनव्यथेशी उपेक्षित माणसाची चाललेली झुंज अण्णाभाऊंच्या साहित्याचे मूलतत्त्व बनले.

आपल्या साहित्यातून केवळ कल्पकतेला त्यांनी हद्‌दपार केले व वास्तवाचा आग्रह नेहमीच धरला. जीवनावरची निष्ठा, त्याच जीवनासाठी केलेल्या संघर्षाचे आशावादी चित्रण करण्याची मूळ

प्रवृत्ती व उपेक्षिताचा संघर्षात शेवटी होणारा निश्चित विजय या सर्वांचा अनुभवाधिष्ठित आत्मविश्वास, समाजपरिवर्तनाच्या कार्यात त्यांनी ओळखलेली साहित्यिकाची महत्त्वपूर्ण जबाबदारी या सर्व विचारमार्गाचे दर्शन त्यांनी आपल्या साहित्यातून तर घडविलेच त्याबरोबर आणखी एक महत्त्वाची गोष्ट त्यांच्या या विचारप्रणालीने साधली ती म्हणजे स्त्री-पुरुष समानता कारण हे दोन वर्गच अभेद्य राहिले तर या समाजामध्ये क्रांती घडवून आणण्यास उशीर लागणार नाही हे त्यांना उमगल्यानेच त्यांनी आपल्या साहित्यात स्त्रीला अत्यंत आदराने, पावित्र्याने आविष्कृत केले व तिच्याच हाती क्रांतीची, समतेची मशाल दिली. संघर्षासाठीची ठिणगी देणाऱ्या अण्णाभाऊंनी आपल्या २ मर्च १९५८ च्या दलित साहित्य संघाच्या वतीने आयोजित केलेल्या पहिल्या साहित्यसंमेलनाच्या उद्घाटनपर भाषणातही ते तशाच प्रकारची अपेक्षा इतर साहित्यिकांकडूनही करताना दिसतात. त्यांच्यामते दलितांविषयी लिहिणाऱ्याने प्रथम त्यांच्याशी एकरूप, एकनिष्ठ असले पाहिजे व त्याने दलितांना व त्यांच्या जीवनाला वरच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न आपल्या कलेतून सतत केला पाहिजे. इतका उदात्त विचार असलेले अण्णाभाऊ असेही आवाहन करतात की, ''आम्हाला गंगेसारखे निर्मळ साहित्य हवे आहे. आम्हांला मांगल्य हवे आहे.''[६]

असे गंगेप्रमाणे निर्मळ, पवित्र साहित्य निर्मितीचे आवाहन करणारे व स्वत:ही त्या आवाहनाशी बांधील राहणारे अण्णा भाऊ साठे प्रत्येक ठिकाणी आदर्श साहित्यनिर्मितीचा आग्रह धरताना दिसतात.

## ०३. कादंबरीतील स्त्री चित्रणे :

अण्णा भाऊ साठे यांनी स्वातंत्र्योत्तर काळातील वठलेल्या मार्गावरुन जाणाऱ्या अनेक लेखकांना नवी मळवाट दाखवून दिली. एक वेगळे अनुभवविश्व त्यांनी महाराष्ट्राच्या रसिकांसमोर आणले. विविध प्रवृत्तीच्या नायिका, प्रतिकूल परिस्थितीतही संघर्ष करत मरणारे नायक, विविध विषयातील जाणिवा प्रस्थापित मुगभाटातील तत्त्वज्ञानापेक्षा वास्तव जीवनाला महत्त्व देणारे वेगळे तत्त्वज्ञान यामुळेच त्यांच्या साहित्यातील वेगळेपण अधोरेखित होऊ शकले.

सर्वार्थाने रसरशीत जीवनदर्शन, वारणाखोऱ्याबरोबरच मुंबईची बकाल वस्ती, त्यातही उठून दिसणाऱ्या व्यक्तिरेखा, स्त्री-चित्रणे अशा साहित्यपरंपरेमुळे त्यांचे साहित्य मुक्तिधाराच वाटल्याचे मत डॉ. खरात व्यक्त करतात.[७]

दारिद्र्य, दु:ख, दैन्य यांच्याशी संघर्ष देत जगणाऱ्या स्वाभिमानी स्त्रियांवर त्यांनी कादंबऱ्या लिहिल्या आणि क्रांतीचे रणशिंगही फुंकले. त्यातूनच १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीच्या लढ्यावर

आधारित कादंबरी 'वारणेच्या खोऱ्यात' लिहिली. अण्णाभाऊंनी या कादंबरीतून त्यांचा परिसर जिवंत केला. तो परिसर, डोंगरदऱ्या, माणसे यांचा जीवनपट त्यांनी उभा केला आणि 'मंगला' सारखी क्रांतीकारक स्त्री या कादंबरीतून त्यांनी उभी केली.

स्त्री चित्रणावर प्रामुख्याने आधारित अशी त्यांची १९४५-४६ मधील कादंबरी म्हणजे, 'चित्रा' होय. यांतून वेगळेच स्त्री विश्व अण्णाभाऊंनी उलगडले. मुंबईसारखे औद्योगिकीकरणामुळे वाढत जाणारे शहर व वेश्या व्यवसाय यांवर आधारित ही कादंबरी. या कादंबरीची नायिका 'चित्रा' अनेक अडचणींना सामोरी जाऊन घरादाराला जगवते. तिची हिच स्वत:ची जगण्याची व इतरांना जगविण्याची धडपड या कादंबरीत आली आहे.

अण्णाभाऊंनी प्रथमच पूर्णत: स्त्री जीवन हे साहित्याचे विषय बनविले. त्यांनी स्त्रीचा स्वाभिमान, तिचा करारीपणा, तिची जगण्याची धडपड, तिचे तिच्या कुटुंबावरील प्रेम यांचे यथार्थ चित्रण साहित्यातून प्रकट केले. ते समाजातील स्त्रीकडे अत्यंत आदराने पाहतात व साहित्यातही तोच तिच्याबद्दलचा आदर राखतात. त्यांच्या स्त्री चित्रणाला अधोरेखित करणाऱ्या नायिकाप्रधान कादंबऱ्यांमधून ही स्त्री चित्रणे अधिक चांगल्याप्रकारे आविष्कृत झाली. विविध जीवनविश्वातील स्त्रीची व्यथा त्यांनी रेखाटली. 'वैजयंता' कादंबरीमधून तमाशाकलावंत स्त्रीचे स्वप्न त्यांनी रेखाटले. या कादंबरीच्या प्रस्तावनेतही त्यांनी "जो कलावंत जनतेची कदर करतो त्याचीच कदर जनता करते आणि हे मी प्रथम लक्षात घेतो आणि मगच लिहितो,"[८] अशी प्रामाणिक भूमिका त्यांनी मांडली. त्यामुळेच 'वैजयंता' कादंबरीची नायिका वैजयंता तेवढ्याच तडफदारपणे प्रेक्षकांसमोर उभी राहते. तिच्याकडे कला सोडून वेगळ्या गोष्टी मागणाऱ्या लोकांना स्पष्टपणे नकार देते व कलेची अभिरुची उच्च पातळीवर नेण्याचा प्रयत्न करते.

अण्णाभाऊंनी या नायिकांमधील स्वाभिमान सतत जागृत ठेवला व त्यांना गुलामगिरीच्या, दास्याच्या बेड्या फेकण्यास सतत प्रेरणा दिली. यातूनच अण्णाभाऊंची 'आवडी' ही एक नायिकाप्रधान, स्त्री चित्रणात्मक कादंबरी निर्माण झाली.

स्वत:ची फसवणूक, पुरुषांकडून होणारी उपेक्षा अजिबात सहन न करणारी आणि परंपरेचे जोखड मानेवर सतत ठेवून जबरदस्तीने जीवन जगण्यापेक्षा, कुढत बसण्यापेक्षा त्या परंपरेलाच नाकारते आणि स्वत:चे जीवन स्वत:ला जसे जगावेसे वाटते त्याचप्रकारे ती जगते त्यातच तिचा दुर्दैवी अंत जरी होत असला तरी शेवटी पश्चातापदग्ध भाऊ व तिचा प्रियकर धनाजी या दोघांच्याही मुखातून शेवटी एकच आरोळी निघते आणि ती म्हणजे 'आवडी'. यातच तिचा विजय असल्याचे अण्णाभाऊ सांगतात व ग्रामीण कुटुंबातील स्त्रीजीवन साहित्यात आणतात.

'चंदन' ही अशीच विधवा कामगार. मुंबईतील झोपडपट्टीत राहणारी, या समाजात एकट्या स्त्रीचे जगणे तर अवघडच पण त्याहीपेक्षा जर ती एकटी स्त्री जर तरुण असेल आणि विधवा असेल तर हा पुरुषी बुभुक्षित नजरांनी भरलेला वासनाधीन समाज तिला चांगले आयुष्य कधीच जगू देत नाही. हे सत्य असले तरी 'चंदन' मात्र त्याही परिस्थितीत आपले शील, पावित्र्य सांभाळत नीतीवर विश्वास ठेवून जगत असते.

## ०४. कादंबरीतील स्त्री चित्रणांचे विशेष :

अण्णाभाऊंच्या अशा या तेजस्वी, बंडखोर नायिका वाचकांच्या मनात खोल घर करुन राहतात. या नायिकांचे अनन्यसाधारण विशेष म्हणजे त्या नैतिक मूल्यांनी झपाटलेल्या आहेत. या प्रत्येक नायिकेला तिचा स्वत:चा असा स्वाभिमान आहे आणि तोच नायिकाप्रधान कादंबऱ्यांना मूल्य प्राप्त करुन देतो. ग्रामीण व शहरी अशा दोन्ही पातळीवरील जीवनाच्या पार्श्वभूमीतून अण्णाभाऊंच्या नायिका प्रकट झाल्या आणि त्या नायिकांनी ती पार्श्वभूमी तर जिवंत केलीच त्याचबरोबर डोंगर, नद्या, ग्रामीण जीवन यांना घेऊन नायिकाही उठून दिसल्या.

अण्णाभाऊंच्या नायिकाप्रधान कादंबऱ्याच नाही तर सर्वच कादंबऱ्यातून येणाऱ्या नायिका अगदी पायाच्या नखापासून डोक्याच्या केसांपर्यंत सुंदर आहेत. तरीही या सौंदर्याचे वर्णन करताना ते कुठेही भडकपणाने न येता उलट पायाच्या नखापासून स्त्री सौंदर्याच्या वर्णनाला अण्णाभाऊंनी सुरुवात केल्यामुळे स्त्रीविषयीचा आदरही अण्णाभाऊंनी त्यातून प्रकट केला. सौंदर्याच्या श्रीमंतीने नटलेल्या या नायिकांचे जीवन मात्र सर्वसामान्य, ग्रामीण, कुटुंबात, दारिद्र्यात व्यथित झाले आहे. अशा सर्वसामान्य कुटुंबातून या नायिका आल्यामुळेच त्या मनाला भुरळ घालतात आणि त्यांच्या ठिकाणचा मोकळेपणा व प्रांजळपणा वाचकांना मोहित करतो. आपल्या चारित्र्यासाठी व शीलासाठी जीवावर उदार होणाऱ्याही नायिका अण्णाभाऊंच्या कादंबरीत पहायला मिळतात. त्याचबरोबर त्या आपल्या प्रियकरासाठी समाजाची पर्वा न करणाऱ्याही आहेत. त्यातूनच स्त्रीमनाचे वेगवेगळे भावविश्व साकारले आहे.

अशी ही अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील सर्वच स्त्री चित्रणे त्यांचा स्वत:चा वेगळा विशेष घेऊनच अवतरतात. अन्यायाविरुद्धची बंडखोरी, संताप, विद्रोह अण्णाभाऊंनी जणू काही स्वत:मधलाच या नायिकांमध्ये ओतला असावा असे वाटते. कारण अण्णा भाऊ स्वत:च्या वैयक्तिक जीवनात अनेक वादळवाऱ्यांशी लढून जीवनात अनेकदा उभे राहिले आहेत. त्यामुळेच अशा वादळवाऱ्याशी सामना करण्याचे सामर्थ्य त्यांनी आपल्या नायक, नायिकांना दिले आहे. म्हणूनच

इतर नायिकांपेक्षा त्या भिन्न ठरतात. या त्यांच्या भिन्नत्वावरुनच या नायिकांवर असलेला अण्णाभाऊंच्या जीवनदृष्टीचा खोलवर प्रभाव प्रकर्षाने जाणवतो.

**०५. कादंबरीतील आशय स्वरुपावरुन तत्त्वप्रणाली :**

एखाद्या बहुआयामी साहित्यिकाने सर्वच साहित्यप्रकारात लीलया संचार करुन कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, पोवाडे, लावण्या या प्रकारातून आपल्या प्रतिभेचा आविष्कार घडवावा तशाप्रकारचे लेखन अण्णाभाऊंचे वाटते. त्यातूनही या सर्व वाङ्मयप्रकारात लेखन करण्याच्या पाठीमागे जर एखादी विशिष्ट प्रेरणा असेल तर ते लेखन ध्येय्यसाध्य ठरु शकते. अशीच प्रेरणा व ध्येयसाध्यता अण्णाभाऊंच्या लेखनात दिसून येते.

अण्णा भाऊ साठे यांना माणसाची आवड होती आणि म्हणूनच आपल्या प्रामाणिक लेखन भूमिका मांडत असताना 'मला माणसं फार आवडतात त्यांना वैफल्याच्या नावाखाली विद्रूप करु नये' असे माणूस प्रेम ते स्पष्ट करतात. अशा या माणसाभोवती, त्याच्या सुख-दु:खाभोवती, त्यांच्या विजय-पराजयाभोवती व त्यांच्या जीवन संघर्षाभोवती अण्णाभाऊंची कादंबरी फिरत राहते. मग तो माणूस दलित असो, कलावंत असो, एखादी स्त्री कामगार असो वा ग्रामीण कुटुंबातील स्त्री असो म्हणजेच या कादंबऱ्यांमधून मांडली जाणारी समस्या व तिची पार्श्वभूमी वेगळी असली तरी स्त्री म्हणून भोगावे लागणारे दु:ख आणि चित्रणासाठी आणलेले कथानक, आशय यांमध्ये थोडासा भेद हा राहतोच. पण हे सर्व साकारण्यापाठीमागची तत्त्वप्रणाली मात्र एकच आणि ती म्हणजे, 'कितीही समस्या आल्या, संकटे उभी राहिली तरी अण्णाभाऊंची कादंबरीतील नायिका त्या सर्व अडचणींवर मात करुन अखेर शेवटी विजयी होणारच.' हा अण्णाभाऊंच्या स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानविषयक बैठकीचा मूळ पीळ आहे. त्याच्या पाठीमागचे अंत:सूत्र मात्र निश्चितच आशादायी आहे आणि ते म्हणजे, 'देशाचे स्वातंत्र्य, स्त्रीचे शील, आणि पुरुषाचा स्वाभिमान' यांच्याशी तडजोड अण्णाभाऊ कधीही करताना दिसत नाहीत. स्त्री ही शीलरक्षणासाठी झगडा घेऊन ताठ उभी राहते. अशी ही अण्णाभाऊंची बांधिलकी स्वत:च्या तत्त्वप्रणालीशी आहे. ही बांधिलकी कादंबरीच्या आशयरुपामध्येही काटेकोरपणे पाळल्याचे दिसते.

अण्णाभाऊंच्या नायिकाप्रधान कादंबऱ्या 'वैजयंता', 'चंदन', 'आवडी' या कादंबऱ्यांचा आशय असा की, 'वैजयंता' या कादंबरीत 'वैजयंता' या नायिकेचा एक कलावंत व एक स्त्री अशा दोन्ही पातळ्यांवर संघर्ष चालू आहे. मुळातच भांडवलशाहीच्या विरोधात असलेले साम्यवादी विचाराने भारावलेले अण्णाभाऊ या प्रस्तुत कादंबरीतूनही भांडवलदार, कंत्राटदार यांना विरोध

करतात व हे लोकच कलेचे मारक कसे आहेत हे स्पष्ट करुन सांगतात व त्याविषयी वेगवेगळ्या व्यक्तिरेखांमध्ये तशी चर्चाही घडवून आणतात. त्यानंतर या कादंबरीतील दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे, तमाशा कलावंत स्त्रियांचे दु:ख या स्त्रियांना नेहमीच एक कलावंत म्हणून न स्वीकारता एक स्त्री म्हणून विचारात घेऊन तिची उपेक्षा केली जाते व तिच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन तिच्या स्त्रीत्वावरच प्रत्येकवेळी घाला घालण्याचाही प्रयत्न केला जातो. पण, यातही अण्णाभाऊ स्वत: एक लोककलाकार असल्याने त्यांना या जीवनाची पूर्ण परिचिती आहे. म्हणूनच शेवटी 'तमाशा' ही मैदानी कला म्हणून जपण्याचा व कलाकार म्हणून रसिक प्रेक्षकांची अभिरुची पातळी वाढवण्याचा प्रयत्न अण्णाभाऊंच्या तत्त्वप्रणालीतून साकारलेली नायिका 'वैजयंता' शेवटपर्यंत करते आणि स्त्री म्हणून जगण्याचे स्वप्नही शेवटी पूर्ण होते.

असा मांगल्यपूर्ण कादंबरीचा शेवट हा सहजपणे न येता तो अण्णाभाऊंनी जाणिवपूर्वक स्वीकारलेल्या तत्त्वप्रणालीचेच फलित वाटतो. विषयस्तरावर जी अण्णाभाऊंच्या कादंबरीत विविधता दिसून येते. ती आशयाला परिणामकारक करते. सामाजिक विषयांना हात घालणाऱ्या त्यांच्या कादंबरीतील सामाजिक जाणीव महत्त्वाची ठरते. सर्व बाजूंनी उपेक्षित, अभावग्रस्त, दु:खी यांच्या सामाजिक जीवनाची कोंडी आणि त्यांच्यातील आर्थिक गुलामगिरी यांचे भयानक वास्तव चित्र जे अण्णाभाऊंच्या कादंबरीत जसेच्या तसे साकारते. त्यापाठीमागे अण्णाभाऊंचा कल्पकतेला असणारा पूर्ण विरोध हीच तत्त्वप्रणाली दिसून येते. म्हणूनच वैजयंता, चंदन, आवडी या नायिका व त्यांचे जीवन अण्णाभाऊंनी केवळ पाहिलेच नाही तर एक तमाशाकलावंत, एक कामगार म्हणून असलेले जीवन अनुभवले होते. म्हणूनच ते जे जगले, पाहिले, अनुभवले त्यालाच आकार दिला असे ते प्रामाणिकपणे सांगतात. आणि सामाजिक परिवर्तनाशी नाते सांगणारे, समाजाला गती देणारे साहित्य ते लिहितात व स्वत:बरोबरच आपल्या नायिकांचाही जीवनविषयक आशावाद चिरंतन ठेवतात ही जगण्या आणि जिंकण्यापाठीमागची सकारात्मक वृत्तीच त्यांच्या कादंबरीच्या आशयाला तत्त्वप्रणालीनुरुप घडविते.

'मेलेलं मेंढरु आगीला भीत न्हाय' हेच अण्णाभाऊंचे तत्त्वज्ञान आहे. हे त्यांनी आपल्या कादंबऱ्यांना दिलेल्या प्रस्तावनांमधून स्पष्ट होते. 'फकिरा' या आपल्या कादंबरीच्या प्रस्तावनेत 'कैफियत'च्या शिर्षकाखाली प्रतिभा, कल्पकता आणि वास्तवता या तीन गोष्टींविषयीचा अन्योन्यसंबंध सांगून आपली तत्त्वे स्पष्ट केली आहेत. त्यांच्यामते, प्रतिभेला सत्याची जोड आणि जीवनाचे दर्शन नसेल तर, प्रतिभा, अनुभूती हे शब्द निरर्थक ठरतात कारण सत्याला जीवनाचा आधार नसेल तर, प्रतिभा अंधारातील आरशाप्रमाणे निरुपयोगी ठरत असल्याचे अण्णाभाऊ सांगतात.

यावरुन अण्णाभाऊंनी प्रतिभेला सत्याची वास्तव जीवनाची जोड दिली आणि केवळ कल्पकतेला नाकारले. त्यांच्यामते कल्पकतेला जीवनाची साथ ही हवीच. याच तत्त्वप्रणालीतून त्यांच्या कादंबऱ्या पूर्णत: वास्तव घटनांवर, वास्तव जीवनात पाहिलेल्या व्यक्तिरेखांवर अवलंबून आहेत.

'वैजयंता' या कादंबरीच्या प्रस्तावनेतूनही असाच साहित्यलेखनाविषयीचा ध्येय्यवाद त्यांनी प्रकट केला आहे. त्यांच्यामते, ''जो कलावंत जनतेची कदर करतो त्याचीच कदर जनता करते. माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. केवळ कल्पकतेचे कृत्रिम डोळे लावून जीवनातील सत्य दिसत नसते.''[९]

या प्रस्तावनेतूनही जनतेची कदर करणारा, त्यांचे जीवन निष्ठेने चित्रित करणारा कलावंत दिसून येतो. म्हणूनच कलावंतानेच मांडलेली कलावंतांचीच दु:खे ही निश्चितच वास्तवतापूर्ण तर आहेतच पण त्याचबरोबर कलात्मकतेच्याही कसोटीवर उतरतात.

'वैर' या कादंबरीच्या प्रस्तावनेतही अण्णा भाऊ सामाजिक परिवर्तनाचे स्वप्न उरी बाळगतात. ते म्हणतात, ''जुन्या चालीरीती दूर कराव्यात आणि अशा या नवमहाराष्ट्रात जनतेमध्ये प्रेम सलोखा यांची वाढ व्हावी, जनता सुखी, संपन्न व्हावी, महाराष्ट्रात विषमता नष्ट झालेली नि समाज-सत्तावादाचा अरुणोदय झालेला आपण पहावा अशी श्रद्धा हृदयात ठेवूनच मी लिहितो.''[१०]

यातूनही समाजातील जातीय, आर्थिक, सामाजिक अशा सर्व प्रकारची विषमता नष्ट होऊन हा समाज एकमेकांच्या वैरामुळे न विभागला जाता तो अखंड, एकसंघच राहिला पाहिजे असे महाराष्ट्र भूमीचे नंदनवन करणारे स्वप्न अण्णाभाऊ पाहतात म्हणून अण्णाभाऊंनी जातीय, आर्थिक संघर्षाचे घोर परिणाम व भयंकर रुप दाखविले आहे. 'चंदन' या कादंबरीतही नायिका चंदन ही दारिद्र्य, गरिबीने पूर्णपणे ग्रासलेली असली तरी ती त्याही परिस्थितीत सर्व प्रतिकूल परिस्थितीशी लढा देत राहते व स्वत:ची अस्मिता स्वत्व कायम ठेवते व शेवटी विजयी होते. पण, तिच्यासमोर तिला तीच संकटे पुन्हा दिसतात. तरीही ती तेवढ्याच निर्धाराने जगण्याचा निश्चय करताना दिसते.

'आवडी' या कादंबरीच्या प्रस्तावनेतही अण्णाभाऊ अशाच प्रकारचा विचार स्पष्ट करतात. ''माझी माणसं मला कुठं ना कुठं भेटलेली असतात त्यांचं जगणं, मरणं मला ठाऊक असतं.''[११] ही आवडी तिचं बंडखोर जीवन व तिचा क्रूर मृत्यू अण्णाभाऊंनी स्वत: पाहिला होता. तेव्हाच ती त्यांच्या प्रतिभेत एकरुप झाली होती आणि नंतर तब्बल चार वर्षांनी सर्व पदर हाती आल्यानंतरच 'आवडी' कादंबरीरुपात मराठी रसिक वाचकांसमोर साकार झाली.

अशा प्रकारे, वैजयंता असो, आवडी असो वा चंदन असो कोणतीही कादंबरी याशिवायही घेतली तरी अण्णाभाऊंच्या विचार, तत्त्वे यांच्या चौकटीबाहेर जाताना दिसत नाही. मग त्याच दिशेने त्यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा, प्रसंगचित्रणे, घटना, कादंबरीची सुरुवात, तिचा होणारा विशिष्ट सुखांत शेवट व तोपर्यंतचा तिचा एकूण विकास प्रवास या सर्व भागांमध्ये प्रत्येक ठिकाणी अण्णाभाऊंची तत्त्वप्रणाली डोकावताना दिसून येते.

## ०६. कादंबरीतून साकारलेली मनस्वी स्त्रीचित्रणे :

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यात तत्कालीन कलावाद कि जीवनवाद अशा कोणत्याही एका वादाची बाजू घेतली गेली नाही तर या दोन्ही प्रवृत्तींचे दर्शन योग्य प्रमाणातच त्यांच्या कादंबरीतून दिसून येते आणि त्यातूनही अण्णा भाऊ कोणत्याही एका दृष्टिकोनाच्या आहारी न जाता आपली स्वत:ची वेगळी शैलीही कायम ठेवतात. त्यांच्या साहित्यात ललित साहित्याचा सौंदर्यगुण काठोकाठ भरला असल्याचे जाणवते. म्हणूनच, वि. स. खांडेकरांनी या लेखकाचे सामर्थ्य जोखले होते, ते म्हणतात, ''अण्णा भाऊंच्या साऱ्या लेखनात एक प्रकारची स्वत:ची ऐट आहे.''[१२]

कोणत्याही वादात न पडणारे अण्णाभाऊ स्वत:च्या प्रेरणांनुसार कादंबरी लेखन करीत राहतात. अफाट अशा जनसागरात गुलामगिरीच्या कचाट्यात सापडलेला, दारिद्रयाने गांजलेला, अगतिक झालेला माणूस केंद्रस्थानी मानून कांदबरी अण्णांनी लिहिली. हा माणूस मग तो त्या कादंबरीचा नायक असो वा नायिका त्यांनी गुलामगिरीची बंधने झुगारून दिली व समोर असलेल्या संघर्षाला तोंड देण्यासाठी उभी राहिली लढाऊ बनली हेच अण्णाभाऊंचे सतत लढण्याचे स्वप्न मनात ठेवूनच अण्णाभाऊंची नायिका जी मनस्वी आहे ती सतत वेगवेगळ्या प्रसंगातही आपली मूल्य, नीती, सत्प्रवृत्ती यांच्यावरची निष्ठा ढळू देत नाही.

अण्णाभाऊंच्या कादंबरीतून साकारणाऱ्या प्रत्येक नायिकेला तिचे स्वत:चे असे वेगळे ठाम मत आहे. ती स्वत: निर्णयक्षम आहे, धाडसी, कर्तबगार आहे. ती स्वत:च्या हक्कासाठी, न्यायासाठी अन्यायाविरुद्ध, शोषणाविरुद्ध बुलंद आवाज उठविते. ही नायिका निराधार असली तरी तिच्या पाठीमागे अण्णाभाऊंच्या भक्कम विचारप्रणालींचा, तत्त्व, आदर्शाचा भक्कम आधार आहे. संपूर्ण देश सुखी, समृद्ध होण्याचे मंगल स्वप्न पाहत असलेले अण्णा भाऊ स्त्रीलासुद्धा आदर्श रुपातच चित्रित करतात. कुठेही तिच्या देहाचे बीभत्स, उत्छृंखल वर्णन न करत तिच्यातील गुणांना अधिक महत्त्व देतात.

अण्णाभाऊंच्या मनस्वी नायिका निराशेच्या कोंडित सापडल्या तरी त्या गांगरत नाहीत कारण, झुंजणं हा त्यांचा जणू काही स्वभावधर्मच बनलेला आहे. या नायिकांच्या बाबतीत हेच सत्य आहे की, मुळातच बेडर नसलेल्या मनाला अविरत होणाऱ्या आघातांनी निर्भय केले होते. म्हणूनच, 'चंदन'ही सुरुवातीला घाबरते पण, ''मनाने दुबळ्या माणसाला परिस्थिती नडवते, नि कणखरही बनवते.''[१३] ( पृ.क्र.३५)हे सत्य तिला माहिती होते म्हणूनच ती लौकरच कणखर बनली.

अण्णा भाऊ स्वत:ही आयुष्यभर जिद्दीनेच जगले होते आणि जिद्द हाच त्यांचा व त्यांच्या वाङ्मयाचा स्थायिभाव होता. त्यांचे जीवनचरित्र पाहिल्यानंतरही हे लक्षात येते की, ''जिद्दीशिवाय त्यांच्याजवळ दुसरे काही भांडवल नव्हते.''[१४]

हीच जिद्द अण्णा भाऊंनी आपल्या नायिकांमध्येही ओतली, रुजविली होती व त्याच जिद्दीने या नायिका लढताना दिसतात व आपली स्वप्ने पूर्ण करतात. ही अण्णाभाऊंची नायिका सत् कसोटीसाठी अनेक दिव्यातून जाणेच पसंद करते व ती त्या कसोटीला खरी उतरते.

**०७. कादंबऱ्यातील साम्यवादी विचारांचे प्रतिबिंबित रुप :**

अण्णा भाऊ साठे हे मानवतावादी वृत्तीचे होते त्यामुळेच माणसाशी नाते जोडून ते मानव्याचे उपासक बनले व 'माणूस' हीच त्यांच्या साहित्यलेखनासाठीची महत्त्वाची संपत्ती बनली. त्यांच्या मानवतावादाला त्यांनी समाजवादी तत्त्वज्ञानाचा शास्त्रशुद्ध आधारही दिला होता. साम्यवादानेच त्यांना मानवाकडे पाहण्याची आंतरराष्ट्रीय व आंतरिक तळमळीची दृष्टी दिली होती.

साम्यवादी विचारांच्या प्रभावामुळेच प्रत्येक शोषित, उपेक्षिताला त्यांनी त्यांच्या हक्कांची जाणीव करुन दिली. 'वैजयंता', 'चंदन' या प्रातिनिधिक कादंबऱ्यामधून मालक-भांडवलदार लोक सर्वसामान्य लोकांना कसे लुबाडतात, फसवणूक करतात यांची जाणिव करुन दिली व त्यांची अस्मिता जागृत केली. साम्यवादी पक्षाने उपेक्षितांचा, शोषितांचा घेतलेला कैवार हेच साम्यवादाच्या पुरस्काराचे प्रमुख कारण अण्णाभाऊंच्या बाबतीत खरे ठरते. या साम्यवादाने समाज, जनता यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला अण्णाभाऊंनी फुले, आंबेडकर, शाहू यांच्या वैचारिक प्रेरणेचीही जोड दिली त्यातूनच ''जग बदल घालूनी घाव । सांगूनी गेले मला भीमराव'' या ओळी साकार होऊन क्रांतीची नवज्योत दोन विचारांच्या संगतीने पेटविली गेली.

'वैजयंता' या कादंबरीतील 'कला' ही या भांडवलशहांची बळी बनली होती. त्या तमाशा कलेला शेवटी 'वैजयंता - उमा' मैदानात जनतेसमोर सादर करतात व या कलेची कनातीमधून मुक्ती करतात. त्यातून केवळ कलाच मुक्त न होता त्या कलेसाठी संपूर्ण जीवन समर्पित करणारे

तमाशा कलावंत ही कंत्राटदार, थेटरमालक यांच्या जाचातून, मक्तेदारीतून मुक्त होतात व मोकळा श्वास घेऊन पुन्हा लोकांच्या केलेला लोकांच्याच स्वाधीन करतात ते ही कलेच्या उद्धारासाठी, विकासासाठीच. 'चंदन' कादंबरीतही नायिका 'चंदन'चा पती जगू कामगार होता. तेथेही तो कडा अंगावर पडून मृत्यू पावतो. त्याचे अनेक कामगार सहकारीही मृत्यू पावतात. पण त्यावेळीही नुकसानभरपाई द्यावी लागेल म्हणून भांडवलदार ज्या कामगारांची प्रेते सापडली नाहीत. असे बेपत्ता झाल्याचे सांगून मोकळे होतात. येथे या कादंबरीतही कामगार-कंत्राटदार-मालक यांच्यातील जीवघेणा संघर्ष अण्णाभाऊंनी उभा केला तो साम्यवादी विचारांच्या प्रभावातूनच. या कंत्राटदारांच्या बेजबाबदार भूमिकेमुळेच चंदनवरही कामगार बनण्याची वेळ येते. या कादंबरीतून कामगारांची सुरक्षितता, त्यांच्यासाठीच्या सोयीसुविधांचा अभाव, स्त्री कामगारांच्या संरक्षणाची विशेष जबाबदारी, निराधार स्त्रिया व त्यांच्या मुलांना आवश्यक असलेले संरक्षण, त्यांची महत्त्वाची निकड अशा सर्व प्रश्नांना वाचा फोडतात.

साम्यवादी विचारांची पक्की बैठक अण्णाभाऊंकडे असल्याने ते शोषक-शोषित, गरीब-श्रीमंत, भांडवलदार-मजूर असा संघर्ष उभा करु शकले यांचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबऱ्यातही पडते. कलात्मकते इतकेच सामाजिकतेला महत्त्व देण्याच्या त्यांच्या वृत्तीचे मूळ त्यांच्या मार्क्सवादी विचारात आढळते. म्हणूनच त्यांनी आपल्या कादंबरीतून वर्गाधिष्ठित समाजरचनेला बाहेर काढले. त्यावेळी कलाकृतीच्या मूळ प्रकृतीला कसलीही बाधा येऊ न देता भांडवलशाही वृत्तीचा पाडाव करणारी सत्याचा विजय दाखविणारी मांडणी जी केलेली आहे त्यांच्या या विचारांचे मूळ साम्यवाद हेच होते. मार्क्सवादी प्रेरणेतून लिहिण्यास प्रारंभ केला तरी त्यांनी आपली सांस्कृतिक परंपरा नाकारली नाही.

## ०८. समारोप :

अशाप्रकारे, अण्णाभाऊंच्या विचारसरणीचे महत्त्वाचे पैलू, त्या विचारसरणीच्या आधाराने चित्रित झालेली स्त्री चित्रणे, त्यांचे विशेष, जाणिवपूर्वक स्वीकारलेली तत्त्वप्रणाली व त्यानुरुप होत जाणारा विशिष्ट ध्येयापर्यंतचा विकास, विचारप्रणालीशी कोणतीही तडजोड न करता, प्रामाणिकपणे केलेले लेखन व त्यातून येणारा साम्यवादी विचार या दिशेने प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास केला.

अण्णाभाऊंच्या नायिकाप्रधान कादंबऱ्यांनी स्त्री जीवनावरील वास्तववादी, स्त्रीवादी कादंबऱ्यांनी दलित साहित्यातीलच नाही तर मराठी वाङ्मयातील स्त्रीवादी लेखनाचा अभाव दूर करुन लेखकांना नवी वाट दाखविली. दलितांना वास्तव जगाच्या सर्व जुलुमांतून मुक्त करणारे साहित्य लिहिले. पोटाची भूक भागविण्यासाठी गाळलेला घाम, विषमतेचे चटके अनुभवताना

डोळ्यांत जमलेले अश्रू व स्वत:च्याच कष्टाचा मोबदला मिळविण्यासाठी सांडलले रक्त यांच्याच माध्यमातून अण्णाभाऊंची कादंबरी निर्माण झाली आहे. या साहित्याच्या माध्यमातून कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या चेहऱ्यावरचा घाम आणि डोळ्यांतील आसवे त्यांनी पुसली कारण जनतेची कदर करणाऱ्या कलावंतांचीच कदत जनता करते. याच जनतेच्या संघर्षावर अढळ विश्वास असणे हे त्यांचे तत्त्वज्ञान होते; म्हणूनच तत्कालीन तत्त्वविचाराच्या चौकटीत अण्णाभाऊंचे साहित्य बसेलच असे नाही. अण्णाभाऊ जनतेत वावरतात, तिच्याशी समरस होतात. तिच्या जीवनलढ्यात सहभागी असतात म्हणून त्यांच्या कलेचा आत्मा जनतेशी निष्ठा ठेवून स्फूर्ती घेतो. या नायिकांना त्यांनी विद्रोहाचे बळ दिले. तीनही कादंबऱ्यांची पार्श्वभूमी, वेगळी असली तरी अस्मितेसाठी चालणारी लढाई मात्र तिघींचीही एकच वाटते. सुसरीच्या मिठीत गेल्यानंतर सुटका करुन सुस्कारा टाकणे बहुत कठीण पण तरीही अण्णाभाऊंच्या कादंबरीत स्त्रिया यशस्वी होतात, या पाठीमागे स्वत: लेखकाचा दृष्टिकोन आहे. अण्णाभाऊंच्या मंगल स्वप्नांचा आविष्कार वैजयंता, चंदन, आवडी या स्त्रीरुपात दिसून येतो. अण्णाभाऊ प्रतिकूल परिस्थितीत अडकून पडलेल्या स्त्रीच्यापुढे नव्या आशेचे जग निर्माण करतात. त्या पाठीमागेही त्यांची लेखनभूमिकाच महत्त्वाची ठरते. या भूमिका विचारात घेता स्त्रीची कहाणी दु:खान्त होणे शक्य नाही. कोणत्याही कादंबरीचा शेवट हा अण्णाभाऊंच्या विचाराचा परिपाकच वाटतो. म्हणूनच अण्णाभाऊंचे जीवन, साहित्य आणि तत्त्वज्ञान वेगवेगळे पाहता येत नाही.

## ०९. निष्कर्ष :

१. अण्णाभाऊंच्या एकूणच साहित्यातून त्यांचे लोकाभिमुखत्व, समाजाभिमुखत्व, जीवनाभिमुखत्व स्पष्ट होते.

२. आचार, विचार, व्यवहार यांच्या मुळाशी जी मानवी मूल्ये असतात. त्या मूल्यांची प्रस्थापना मानवी जीवनात व्हावी हेच अण्णाभाऊंचे स्वप्न होते.

३. साम्यवादाच्या वेडाने व एकलव्याच्या जिद्दीने साधना करणारे अण्णाभाऊ साहित्याला समाजपरिवर्तनाचे शस्त्र मानतात.

४. समाजातील जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांचे वास्तव चित्र अण्णाभाऊ पूर्ण सहानुभूतीने रेखाटतात.

५. प्रतिभेला सत्याचा व कल्पकतेला जीवनाचा आधार देणारी खरी कला सदैव काळजाशी भिडून बोलते. यावर त्यांचा विश्वास होता.

६. अन्यायाविरुद्ध, शोषणाविरुद्ध पेटविणारे अण्णाभाऊंचे साहित्य हे मुक्तिधाराच वाटते.

७. माणसावरचे प्रेम व त्याच्या संघर्षावरचा विश्वास यातून झालेले आशावादी लेखन अण्णाभाऊंनी केले.

८. देशाचे स्वातंत्र्य, स्त्रीचे शील व पुरुषाचा स्वाभिमान ही अण्णाभाऊंच्या साहित्याची महत्त्वाची त्रिसूत्री आहे. ज्यावर त्यांचे संपूर्ण साहित्य उभे आहे.

९. 'मेलेलं मेंढरु आगीला भीत न्हाय' असे म्हणून अण्णाभाऊ स्त्रीला आपल्या कांदबरीत कणखर बनवतात.

१०. अण्णाभाऊंच्या कादंबरीलेखनात अंत:करणाला सरळ जाऊन भिडेल असा एक अत्यंत नैसर्गिक जोम, कसदारपणा, आवेश आणि माणसाबद्दलचा जिव्हाळा तिच्यामध्ये ओतप्रोत भरुन राहिला आहे.

## १०. संदर्भ :


१) साठे अण्णा भाऊ : 'चित्रा', नवमहाराष्ट्र प्रकाशन, आवृत्ती पहिली, १९५१, पृष्ठ क्र.६.

२) साठे अण्णा भाऊ : 'वारणेच्या खोऱ्यात', आवृत्ती पहिली, १९५१, अर्पणपत्रिका.

३) मनोहर यशंवत (संपा.) : अण्णा भाऊ साठे, विचारक्रांती विशेषांक, पृ. क्र ४.

४) पाटील द. म. : अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय, पंचगंगा प्रकाशन, मार्च २०००, पृष्ठ क्र.४७.

५) गुरव डॉ. बाबुराव : अण्णा भाऊ साठे : समाजविचार व साहित्य-विवेचन, आवृत्ती दुसरी १९९९, प्रकरण १ ले, अण्णा भाऊ साठे : समाजविचार आणि वाङ्मयीन दृष्टिकोण, पृष्ठ क्र. ६.

६) आसाराम गायकवाड (संपा.) : 'लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे', ग्रंथामधील अण्णा भाऊ साठे यांचे पहिले दलित साहित्य संमेलन २ मार्च १९५८ मध्ये झालेले भाषण, पृष्ठ क्र. ३६.

७) खरात डॉ. प्रकाश : दलित कथा : उगम आणि विकास, १९६३ ते १९८१, प्रकरण ३ रे, सुगावा प्रकाशन, आवृत्ती पहिली १९९२, पृष्ठ क्र. ६९.

८) साठे अण्णा भाऊ : 'वैजयंता', प्रस्तावना, मॅजेस्टिक प्रकाशन, आवृत्ती चौथी, पृष्ठ क्र. २.

९) तत्रैव : पृष्ठ क्र. २.

१०) साठे अण्णा भाऊ : 'वैर', नवमहाराष्ट्र प्रकाशन, आवृत्ती दुसरी १९७५, प्रस्तावना.

११) साठे अण्णा भाऊ : 'आवडी', सुरेश एजन्सी, पुणे, आवृत्ती पाचवी, पृष्ठ क्र. १.

१२) खांडेकर वि. स. : साहित्यचिंतन, जनार्दन वाघमारे मधील लेख अण्णा भाऊ साठे एक विद्रोही वादळ, प्रतिमा प्रकाशन, आवृत्ती दुसरी १९९६, पृष्ठ क्र.१३८.

१३) साठे अण्णा भाऊ : 'चंदन', चंद्रकांत शेटे प्रकाशन, आवृत्ती चौथी, १९७६, पृष्ठ क्र. ३५.

१४) कऱ्हाडे डॉ. सदा : लोकराज्य विशेषांक, १ ऑगस्ट १९८५, मुंबई महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र. ४


-----x-----